॥कर्दळीवन॥ सेवा संघ आयोजित

पंच कैलासमधील दुसरे कैलास

# मणिमहेश कैलास यात्रा 2020

भगवान भोलेनाथाची अद्भुत आणि अविस्मरणीय अनुभूती



वयोमर्यादा: १८ ते ७० वर्षे

दिल्ली ते दिल्ली: १२ दिवस * २ बॅचेस १) २ ते १२ जून २) १६ ते २६ जून

सहभागी शुल्क : ₹ २९,०००/- * फक्त ₹ १०,०००/- भरुन नोंदणी करा.

सर्व माहिती व ऑनलाईन नोंदणीसाठी -www.kardaliwan.com/manimahesh

**मर्यादित जागा ... त्वरीत नोंदणी करा...**

**कर्दळीवन सेवा संघ, पुणे** ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे - ०४

मो: 9657709678 / 9371102439 व्हॉटस्‌अॅप : 7057617018

फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com



॥ ॐ नमः शिवाय ॥



# मणि महेश कैलास यात्रा २०२०

कैलास हे नाव जरी उच्चारले तर प्रत्येक भारतीयाचा कंठ दाटून येतो. शिव शंकर भोलेनाथ हे प्रत्येकाचे दैवत आहे. देशामध्ये कोणत्याही राज्यात, कोणत्याही जिल्ह्यात आणि कोणत्याही खेड्यामध्ये जा. तेथे शंकराचे मंदिर हमखास आढळेल. विश्वाची उत्पत्ती करणारा ब्रह्मदेव, विश्वाचा सांभाळ करणारा विष्णू आणि विश्वाचा संहार करणारा शंकर हे तीनही देव भारतीय जनमानसामध्ये खोलवर बिंबले आहेत. कैलास पर्वत हे शंकराचे वास्तव्याचे ठिकाण मानले गेले आहे. कैलासमध्ये प्रत्यक्ष शिवशंकर वास करत असून तीच त्यांची लीला भूमी आहे, अशी प्रगाढ श्रद्धा आहे. शिवशंकराबरोबरच श्रीविष्णू, श्री ब्रह्मा आणि इतर सर्व देव देवता, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा इ. सर्व कैलासाच्या परिसरातच रहात आहेत असा विश्वास आहे. स्वर्ग आणि नरक हेही तिथेच कुठेतरी असावेत अशीही श्रद्धा आहे. त्यामुळे कैलास या नावाभोवतीच एक अद्भुत रम्य अशा गुढतेचे वलय आहे. अगदी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यावरही ती कैलासवासी झाली असे म्हणण्याची प्रथा आहे. कैलास यात्रा म्हणजे आत्मोन्नत्तीची यात्रा होय. जीवनाचे अंतिम लक्ष्य किंवा जीवनात जिंकायचा शेवटचा पुरुषार्थ म्हणजे मोक्ष. त्यालाच मुक्ती असेही म्हटले जाते. कैलासची वाट ही जणू मोक्षाची वाट आहे. हृदयातील सर्व मलिनता निघून जावून आसक्तीचे सर्व मोह–पाश तोडून टाकून त्या ब्रह्मतत्त्वाशी, त्या आत्मतत्त्वाशी एकरुप होण्याचा मार्ग म्हणजे मुक्तीचा मार्ग. कैलासला जाताना आपण मुक्तीचा मार्गावर वाटचाल करीत असतो. कैलासाबद्दलचे एक विलक्षण आकर्षण जनमानसात हजारो वर्षे घट्ट बसले आहे. सत्ययुग असो की त्रेतायुग, द्वापार युग असो की कलियुग. तपश्चर्या, साधना, आध्यात्मिक उन्नती यासाठी सर्वांनी कैलासाचीच वाट पकडली आहे. देवदेवता असोत की यक्ष, किन्नर, ऋषी आणि मनुष्य असो की राक्षसगण. सर्वांनी काहीतरी भव्य दिव्य मिळविण्यासाठी जी तप:साधना केली, ती कैलासाजवळ जावूनच. भोळ्या सांबाला भेटायला, त्याला प्रसन्न करुन घ्यायला आणि त्याच्याकडून वर मिळवून घ्यायला सर्वजण कैलासाकडेच धावले आहेत. यामध्ये काहीतरी विशेष आहे. काहीतरी खास बात आहे. ती म्हणजे पावित्र्य, मंगलता आणि अध्यात्मिक उर्जा. कैलास पर्वता सभोवतालची दैवी स्पंदने आणि ईश्वरी कंपने एका अत्यंत उच्च आणि रोमांचकारी अनुभवांची अनुभूती देतात. हजारो ऋषी मुनी, देवता यांनी निसंग वृत्तीने राहून निरपेक्ष वृत्तीने प्राणांची बाजी लावून केलेली ईश्वराची आराधना याचेच हे फळ असावे.

**पंचकैलास संकल्पना –** कैलास मानसरोवर जरी जगप्रसिद्ध असले तरी हिमालयामध्ये पंचकैलास ही संकल्पना प्रचलित आहे. पाच या आकड्याचे फार मोठे महात्म्य अध्यात्मिक आणि धार्मिक संस्कृतीमध्ये मानले गेले आहे. संपूर्ण पृथ्वी पंचमहाभूतांपासून निर्माण झाली आहे. प्रत्येकाला पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये असतात. पंचमुखी रुद्राक्ष पवित्र मानला जातो. याचप्रमाणे पंच कैलास, पंच बद्री, पंच केदार आणि पंच प्रयाग ही क्षेत्रे हिमालयामध्ये अत्यंत पवित्र मानली जातात. पंच कैलासमध्ये १) आदि कैलास २) माणिमहेश कैलास ३) श्रीखंड महादेव कैलास ४) किन्नर कैलास ५) कैलास मानसरोवर यांचा समावेश होतो.

**मणिमहेश कैलास** यालाच भरमौरी कैलास असेही म्हटले जाते. कारण ते भरमौर या गावाजवळ आहे. मणिमहेश कैलास हे शिव पार्वतीचे क्रिडा स्थान आहे अशी श्रद्धा आहे. आपल्या जीवनातील एकांताचा काळ शिवपार्वती या परिसरामध्ये व्यतीत करतात. मणिमहेश तलाव समुद्रसपाटी पासून सुमारे १३००० फूट उंचीवर असून तेथून समोर दिसणारे भरमौरी कैलास पर्वत शिखर समुद्रसपाटीपासून १९००० फूट उंचीवर आहे. पूर्णपणे बर्फाने आच्छादित अशा या पर्वतावर पहाटे पहाटे एक प्रकाश किरण प्रकट होतो. हा प्रकाश किरण भगवान शंकराच्या गळ्यातील नागाच्या फण्यावर असलेल्या मण्यापासून निघतो आणि या पर्वतावर पसरतो. याचा अर्थ त्या प्रकाशकिरणांबरोबर भगवान शंकरांचे आगमन भरमौरी कैलाशावर झाले आहे. म्हणूनच या तलावाला मणिमहेश तलाव असे म्हटले जाते. मणि महेश कैलास हे ठिकाण हिमाचल प्रदेशामध्ये चम्बा जिल्ह्यामध्ये आहे. दिल्लीपासून ५०० कि.मी. पठाणकोट आणि तेथून १३५ कि.मी. वर चम्बा हे ठिकाण आहे. तेथून ६५ कि. मी. भरमौर आणि तेथून १२ किमीवर हडसर या गावापर्यंत रस्त्याने बसने अथवा वाहनाने जाता येते. हडसर वरुन मग पायी परिक्रमा सुरु होते.. हडसर पासून ७ कि. मी. अंतरावर धनछौह हे ठिकाण लागते. त्याच्या पुढे ७ कि. मी. अंतरावर पार्वती कुंड आहे. येथे पार्वती माता स्नान करते अशी श्रद्धा आहे. त्याच्यापुढे १ कि. मी. अंतरावर मणिमहेश कुंड असून त्यासमोर भरमौरी

कैलासाचे दर्शन होते. त्यामध्ये अनेकदा गणपती, नंदी, कार्तिकेय इ. देवतांचेही दर्शन होते अशी श्रद्धा आहे. धनछौह या ठिकाणी भस्मासुराने शिवशंकर प्रसन्न व्हावेत म्हणून उग्र तपश्चर्या केली होती. भगवान शंकर प्रसन्न झाल्यावर ज्याच्या डोक्यावर तू हात ठेवशील तो भस्म होईल असे वरदान त्यांनी भस्मासूराला दिले होते. हे ठिकाण शिवपार्वतीचे क्रिडा ठिकाण असल्याने भस्मासुराला वर देताना शंकराबरोबर पार्वतीही त्यांच्याबरोबर होती. तिला पाहून भस्मासूर पार्वतीच्या मागे लागला. तेव्हा शंकरांनी त्याला अडविले. तर तो शंकराच्या डोक्यावरती हात ठेवण्यासाठी त्यांच्या मागे लागला. नंतर भगवान विष्णू यांनी मोहिनीचे रुप घेऊन नृत्य करता करता भस्मासुराला त्याच्याच डोक्यावर हात ठेवायला लावून त्याचा नाश केला अशी कथा आहे.

**सहभागी शुल्क ₹ २९,०००/- (+ जीएसटी ₹ १४५०/-) (११ दिवस)**

GST 5% Extra

**फक्त ₹ १०,०००/- भरून नोंदणी करा. उर्वरीत रक्कम यात्रेच्या १५ दिवस अगोदर जमा करणे.**

**२ बॅचेस** : १) २ ते १२ जून २०२० २) १६ ते २६ जून २०२०

वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे

- **वैशिष्ट्ये : –** १) अनुभवी आयोजक, मार्गदर्शक आणि शेर्पा
  २) सुसज्ज वैद्यकीय किट, ऑक्सिजन सिलिंडर्स आणि इमर्जन्सी व्यवस्था

- **यात्रेत सहभागी कसे व्हायचे?**

  यात्रेच्या पहिल्या दिवशी दिल्ली येथे दुपारी ४ pm नंतर पोहोचावे. तेथे स्वयंसेवकांची भेट होईल. तेथून यात्रेच्या कार्यक्रमानुसार यात्रा सुरु होईल.

- **यात्रा कार्यक्रम**

पहिला दिवस – दिल्ली आगमन – मुक्काम
दुसरा दिवस – दिल्ली ते पठाणकोट (बसने) – मुक्काम
तिसरा दिवस – पठाणकोट ते भरमौर (वाहनाने) – मुक्काम
चौथा दिवस – भरमौर – भरमानी – भरमौर मुक्काम (ट्रेक ८ किमी)
पाचवा दिवस – भरमौर – हडसर (जीप १३ किमी) – ढंचो मुक्काम (ट्रेक ७ किमी)
सहावा दिवस – ढंचो – मणिमहेश तलाव – मुक्काम (ट्रेक ७किमी)
सातवा दिवस – मणि महेश – ढंचो मुक्काम (ट्रेक ७ किमी)
आठवा दिवस – ढंचो – हडसर – भरमौर – मुक्काम (ट्रेक ७ किमी)
नववा दिवस – भरमौर – डलहौसी मुक्काम (वाहनाने)
दहावा दिवस – डलहौसी – पठाणकोट – रात्रीच्या रेल्वे/बसने दिल्लीकडे प्रयाण
अकरावा दिवस – दिल्लीत आगमन – यात्रा समाप्त (दिल्ली येथे मुक्काम नाही)

**ट्रेकसाठी पोनी म्हणजे घोडा उपलब्ध आहे. घोड्यासाठी प्रतिदिन अंदाजे सरासरी रु. १२०० ते रु. १५०० एवढा खर्च येऊ शकतो. हा खर्च यात्रींनी प्रत्यक्ष यात्रेच्या दरम्यान करायचा आहे.**

**विशेष सूचना : – यात्रा कार्यक्रम नियोजित आहे. काही अपरिहार्य कारणे, नैसर्गिक समस्या, दरडी कोसळणे, गाडी ब्रेक डाऊन होणे, रस्ता बंद होणे, राजकीय समस्या, आंदोलने इ. आयोजकांच्या मर्यादांपलिकडे काही घटना घडल्यास कार्यक्रमपत्रिकेमध्ये बदल घडू शकतो याची कृपया नोंद घ्यावी. त्यावेळी सर्व प्रकारचे सहकार्य करावे लागेल.**

## बँक खात्याची माहिती

**बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना शाखा, पुणे ४११००४**

**खात्याचे नाव : कर्दळीवन सेवा संघ एल. एल. पी. (Kardaliwan Seva Sangh LLP)**

**खाते क्रमांक : 60351921286 IFSC Code : MAHB0000003**

- **नोंदणी कशी करावी ?**

१) नोंदणी अर्ज पूर्ण भरून, सही करून सोबत आधारकार्ड किंवा पॅनकार्ड आणि दोन फोटो द्यावेत.

२) नोंदणीच्या वेळी रु. १०,०००/– एवढी रक्कम भरावी लागेल.

३) यात्रेच्या तारखेआधी १५ दिवस उरलेली रक्कम भरावी लागेल.

४) एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. भरलेली रक्कम परत मिळणार नाही. यात्रे आधी २० दिवस आपण बदली व्यक्ती देवू शकता.

- **मणि महेश कैलास यात्रेसंबंधी महत्त्वाच्या सूचना**

१) हिमालयातील उंचीवरील पर्वतरांगामधील ही यात्रा आहे. प्रत्येक यात्रेकरूला यासाठी तयार केलेले नियम आणि सूचना यांचे पालन करावे लागेल. हिमालयामध्ये आपल्याबरोबर असणारे शेर्पा आणि गाईड यांच्याबरोबर सौजन्यपूर्ण प्रेमळ संवाद ठेवावा लागेल. आपल्यासाठी ते सर्व प्रकारचा त्रास सोसून सहकार्य करीत असतात. जरी हा त्यांचा व्यवसाय असला तरीही त्यापलिकडे जाऊन त्यांचेबरोबर आत्मिय वर्तन असणे गरजेचे आहे. प्रत्येक यात्रेकरूने यात्रेदरम्यान समूहाबरोबरच चालायचे आहे. स्वतंत्रपणे किंवा एकट्याने चालू नये.

२) नोंदणी करताना यात्रेकरूंनी मणि महेश कैलास यात्रा करण्यास शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत याची खात्री करून घ्यावी, ही विनंती. मणि महेश कैलास यात्रे सारख्या साहसी अध्यात्मिक यात्रांमध्ये काही प्रमाणामध्ये निश्चितच जोखिम असते. प्रत्येक यात्रेकरूने ती नीट समजून घ्यावी आणि आपले जवळचे कुटुंबीय, नातेवाईक यांना त्याची कल्पना द्यावी. नैसर्गिक आपत्ती, बदलते हवामान, अचानक आलेल्या अडचणी आणि अनाकलनीय परिस्थिती यामुळे गंभीर समस्या उद्भवण्याचा संभव असतो. हिमालयातील यात्रांमध्ये जिवित हानी, वित्त हानी अपघात घडण्याचे प्रसंगही येवू शकतात. प्रत्येक यात्रेकरूने पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर ही यात्रा करावी. कोणतीही अनपेक्षित घटना घडल्यास कोणत्याही कारणाने आयोजकांना जबाबदार धरता येणार नाही आणि आयोजकांवर कोणतीही कायदेशीर जबाबदारी असणार नाही याची नोंद प्रत्येक यात्रेकरूंनी घ्यावी, ही विनंती.

३) यात्रेदरम्यान फक्त शाकाहारी भोजनाचीच व्यवस्था केलेली आहे याची नोंद घ्यावी. कोणताही यात्रेकरू त्याच्या वर्तनामुळे, शारीरिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे यात्रा करण्यास अयोग्य ठरला तर त्याला यात्रेमधून वगळण्याचा, परत पाठवण्याचा अधिकार यात्रा प्रमुखाकडे असेल याची कृपया नोंद घ्यावी. अशा वगळलेल्या व्यक्तींना कोणताही आर्थिक परतावा मिळणार नाही. यावेळी यात्रा प्रमुखाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल. कृपया नोंदणी करण्यापूर्वी विनासंकोच यात्रेची सर्व माहिती समजावून घ्यावी. शंका समाधान करून घ्यावे. त्यानंतरच नोंदणी करावी.

४) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायलयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहिल.

**मेडीकल रिपोर्ट विषयी** - प्रत्येक यात्रेकरूने स्वत:चा मेडीकल चेकअप करून घ्यावा. मात्र त्यांनी मेडीकल रिपोर्ट आमच्याकडे सादर करायची आवश्यकता नाही. स्वत:च्या शारिरीक तंदुरूस्तीची यात्रेकरूनी खात्री करावी. त्यासाठी त्यांनी आवश्यक वाटल्यास खालील चाचण्या करून घ्याव्यात अशी सूचना आहे. 1) Haemogram 2) LFT 3) KFT 4) LIPID Profile 5) Chest X Ray - PA View 6) Pulse / POP / Chest 7) TMT and ECG

# मणि महेश कैलास यात्रेची तयारी आणि कपडे व अन्य आवश्यक सामानासंबधी सूचना

**अ)** मणि महेश कैलास यात्रेदरम्यान आपण हिमालयामध्ये १०,००० ते १५,००० फूट उंचीवर चालत जातो. हिमालयातील लहरी हवामान, थंड वारे, अवकाळी पाऊस, बर्फातून प्रवास या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. यात्रेआधीपासून तीन महिने रोज किमान ६ ते ८ किमी चालण्याचा सराव करावा. त्याचबरोबर दीर्घश्वसन आणि प्राणायाम याचा अभ्यास करावा. हिमालयातील यात्रा ही फक्त साहसी नसून आपल्या शारिरीक आणि मानसिक क्षमतांची खडतर परीक्षा घेणारी आहे, हे लक्षात ठेवावे. त्यामुळे आपल्या शरीराची सर्वात जास्त काळजी आपल्यालाच घ्यायची आहे हे प्रत्येक यात्रेकरूने लक्षात ठेवावे. आपल्याबरोबर कमीत कमी सामान तसेच थंडी वाऱ्यापासून, पाऊसापासून रक्षण करणारे कपडे आपल्या बरोबर असावेत.

**प्रत्येक यात्रेकरूने खालील वस्तू आपल्याबरोबर घ्याव्यात अशी सूचना आहे.**

१) कानटोपीसह वाऱ्यापासून संरक्षण करणारे जॅकेट - १
२) पूर्ण बाह्याचे स्वेटर - १
३) लोकरीचे हातमोजे १, लोकरीचे पायमोजे -१, सूती पायमोजे-२
४) पॅंट-टी शर्ट/सलवार कमीज ३ ते ४ सेट
५) ट्रेकींगसाठी मजबूत शूज -१ त्यासोबत शू लेस -२ (नेहमीचे बूट ट्रेकींगसाठी चालणार नाहीत.)
६) पाण्याची बाटली.
७) सन ग्लास गॉगल.
८) छोटी LED बॅटरी सोबत २ सेल एक्स्ट्रा.
९) रेन कोट (मोठा आकार)
१०) सामानासाठी मध्यम आकाराची सॅक - १
११) छोटी पाठीवरची ट्रेकींगसाठी मजबूत सॅक.
१२) सन स्क्रिन लोशन.
१३) रबरी स्लीपर्स इ.
१४) कॅमरेचा पाऊच - ज्यात कॅमेरा, पैसे, औषधे, कागदपत्रे ठेवता येतील.

**ब)** यात्रेची सुरूवात दररोज सकाळी ८ च्या दरम्यान होईल. संध्याकाळी ६ पर्यंत पुढच्या टप्प्यावरील कॅंप वर पोहोचू. सकाळी लवकरात लवकर चालायला सुरूवात करायची आहे.

**क)** यात्रे दरम्यान सावध आणि आत्मविश्वासपूर्वक चाल आवश्यक आहे. अवघड वाटांवर चालताना सर्वांच्या बरोबरीने शेर्पा आणि गाईड यांचे सहकार्य घ्यायचे आहे. एकट्याने कुठलेही धाडस करु नये. यात्रा समूहाने करायची आहे. आपली आणि आपल्या समूहाची काळजी आपल्यालाच घ्यायची आहे.

**ड)** ट्रेकींग दरम्यान आपले लगेज ७ कि.ग्रॅ. एवढ्या मर्यादेमध्ये असावे. जास्त सामानासाठी चार्जेस द्यावे लागतील.

**इ)** रात्रीचा मुक्काम तंबू / गावांमधील घरांमध्ये (Home Stay) आहे. चपाती/ पूरी, डाळ, भाजी, भात, लोणचे, पराठे, सूप ,चहा, कॉफी आणि स्थानिक भाज्या यांचा आहारात समावेश असेल.

## कर्दळीवन सेवा संघाविषयी माहिती

कर्दळीवन सेवा संघ पुणे ही धार्मिक साहसी आणि आध्यात्मिक यात्रा परिक्रमा सहली अयोजित करते. नाविन्यपूर्ण, अपरिचित परंतु जागृत आणि दैवी अनुभूती देणाऱ्या यात्रा परिक्रमांचे आयोजन हे कर्दळीवन सेवा संघाचे वैशिष्ट्य आहे. कर्दळीवन सेवा संघ पुढील यात्रा–परिक्रमांचे आयोजन करते.

१) कर्दळीवन परिक्रमा २) ४ प्रकारच्या श्रीदत्तधाम परिक्रमा ३) शनीपीठांची शनी परिक्रमा ४) स्वामीमठ यात्रा ५) गुरुचरित्र १४वा अध्याय पारायण परिक्रमा ६) नवनाथ परिक्रमा ७) उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा ८) संजीवन समाधी परिक्रमा

**हिमालयातील यात्रा** – १) स्वर्गारोहिणी यात्रा– जेथून पांडव स्वर्गाकडे गेले २) आदि कैलास यात्रा ३) मणिमहेश कैलास यात्रा ४) श्रीखंड कैलास यात्रा ५) पंचकेदार यात्रा ६) पंच बदरी यात्रा ७) मुक्तीनाथ

**विदेशातील सहली** – १) जगातील सर्वांत मोठे हिंदू मंदिर – अंगकोरवाट कंबोडिया

**पर्यावरण + आध्यात्मिक सहल** – १) नक्षत्रवृक्ष परिक्रमा (नक्षत्र होम आणि ऑरा स्कॅनिंग सह)

**इंडॉलॉजी सहल** – १) शून्याची परिक्रमा – भास्कराचार्य पाटणादेवी पितळखोरे लेणी अभ्यास सहल

**विविध उपक्रमांचे अपडेट्स मिळवत रहा... कर्दळीवन सेवा संघाच्या व्हाट्सअप लिस्टला जॉईन व्हा...**

**आमचा ७०५७६१७०१८ हा व्हाट्सअप क्रमांक सेव्ह करा आणि त्यावर Join KSS असा मेसेज पाठवा.**

**वेबसाईटला सबस्क्राइब करा... फ्री नित्यपाठ पुस्तिका मिळवा - www.kardaliwan.com/nityapath**

SCAN ME

आमची पुस्तके खरेदी करण्यासाठी स्कॅन करा

SCAN ME

आमच्या परिक्रमेच्या माहितीसाठी स्कॅन करा

SCAN ME

आमचे फेसबुक पेज लाईक करा